सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते महाराणा प्रताप सिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. विलास शिंदे, श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख आदी उपस्थित होते.

# महाराणा प्रताप सिंह यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी महाराणा प्रताप सिंह यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते महाराणा प्रताप सिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. तानाजी चौगुले, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, सुरेश बंडगर, मधुकर पाटील, राजेंद्र जाधव, सौरभ पवार, महेश नायकवडी आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठात महाराणा प्रतापसिंह जयंती उत्साहात

कोल्हापूर : महाराणा प्रतापसिंह यांची जयंती मंगळवारी शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रकाश गायकवाड, सुरेश बंडगर, मधुकर पाटील, राजेंद्र जाधव, सौरभ पवार, महेश नायकवडी यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी उपस्थित होते.

लोकमत

## शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठात सोमवारी (दि. २२) महाराणा प्रतापसिंह यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रकाश गायकवाड, आदी यावेळी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
2 3 MAY 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांच्या क्षमतांना वाव दिल्यास समाज सुदृढ

## प्र.कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील; 'शहाजी'मध्ये समाजशास्त्र परिषदेचे उद्‌घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात महिलांच्या क्षमतांना हिमनगासारखा केवळ २० टक्केच वाव मिळाला आहे. ८० टक्के त्या पाण्याखालील हिमनगासारख्या आहेत. महिलांच्या या क्षमतांना वाव मिळाला तर समाज अधिक सुदृढ बनेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्राचार्य डॉ. आर.के.शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते.

समाजशास्त्र परिषदेतर्फे दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार प्रा. आर. बी. पाटील, डॉ. एन. डी.जत्राटकर, डॉ.रमेश जाधव, प्रा. एस.डी.अकोळे यांना समाजशास्त्राचे




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र परिषद अधिवेशनात जीवनगौरव पुरस्कार प्रा. आर. बी. पाटील, डॉ. एन. डी.जत्राटकर, डॉ.रमेश जाधव, प्रा. एस.डी.अकोळे यांना प्रदानप्रसंगी समाजशास्त्राचे ज्येष्ठ प्रा. एस. एन. पवार.**

ज्येष्ठ प्राध्यापक एस. एन. पवार यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्षा डॉ. प्रतिमा परदेशी यांनी स्त्रियांच्या प्रगतीचा आढावा घेऊन त्यांना येणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपाय योजनांचा उहापोह केला.

स्वातंत्र्याची ७५ वर्षे व स्त्रिया या विषयाच्या अनुषंगाने अनेक विद्यार्थ्यांनी संशोधन पेपर सादर केले. परिषदेचे समन्वयक डॉ. के.एम.देसाई यांनी स्वागत केले. परिषदेचे अध्यक्ष प्रा.डॉ.मच्छिंद्र सकटे यांनी प्रास्ताविक केले.

पुण्यनगरी




# महिलांच्या क्षमतांना वाव दिल्यास समाज सुदृढ : डॉ. पाटील

## शहाजी महाविद्यालयातील समाजशास्त्र परिषद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महिलांच्या क्षमतांना वाव मिळाला तर त्या हिमालयासारख्या दिसतील. समाज अधिक सुदृढ बनेल, विकसित होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र परिषदेच्या चौदाव्या अधिवेशनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते.

समाजशास्त्र परिषदेच्या वतीने जीवनगौरव पुरस्कार प्रो. आर. बी. पाटील, डॉ. एन. डी. जत्राटकर, डॉ. रमेश जाधव, प्रो. एस. डी. अकोळे यांना समाजशास्त्राचे ज्येष्ठ प्रा. एस. एन. पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्षा डॉ. प्रतिमा परदेशी यांनी स्त्रियांच्या प्रगतीचा आढावा घेऊन त्यांना येणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपाय योजनांचा ऊहापोह केला.

या परिषदेचे समन्वयक डॉ. के. एम. देसाई यांनी स्वागत केले. परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी प्रास्ताविक केले, तसेच समाजशास्त्र परिषदेसाठी ५ हजार रुपयांची देणगी जाहीर केली, तर जीवनगौरव पुरस्कारप्राप्त प्राध्यापकांनीही प्रत्येकी दहा हजार रुपयांची देणगी दिली. या उपक्रमास श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, मानद सचिव संगीता बोंद्रे यांचे प्रोत्साहन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 MAY 2023

सकाळ

# सत्यशोधकांनी स्त्री मुक्तीचे कार्य करावे

## समाजशास्त्र परिषदेतील सूर; डॉ. रमेश जाधव, जत्राटकर यांच्यासह चौघांना जीवनगौरव पुरस्कार

कोल्हापूर, ता. २२ : स्त्री- पुरूष समानता झाली, तरच भारत महासत्ता होण्याचे आपले स्वप्न साकारणार आहे. स्त्रियांना अधिकचे स्वातंत्र्य, हक्क मिळायला हवेत. सत्यशोधक बुद्धिजीवींनी एक भूमिका घेऊन स्त्री मुक्तीचे कार्य करणे आवश्यक आहे, असा सूर सोमवारी शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र परिषदेच्या १४ व्या राज्यस्तरीय अधिवेशनात व्यक्त झाला.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र परिषदेच्या १४ व्या राज्यस्तरीय अधिवेशनात समाजशास्त्राचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. एस. एन. पवार यांच्या हस्ते प्रा. एस. डी. अकोळे, डॉ. रमेश जाधव, एन. डी. जत्राटकर, आर. बी. पाटील यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी डावीकडून डॉ. मच्छिंद्र सकटे, संभाजी कांबळे उपस्थित होते.

येथील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या व्ही. आर. शिंदे सभागृहातील या अधिवेशनाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते झाले. समाजशास्त्र विषयात अध्यापन, संशोधन क्षेत्रात विशेष योगदान देणाऱ्या डॉ. रमेश जाधव, एन. डी. जत्राटकर, आर. बी. पाटील, एस. डी. अकोळे, यांना समाजशास्त्राचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. एस. एन. पवार यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. मानपत्र, शाल असे पुरस्काराचे स्वरूप होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्षा डॉ. प्रतिमा परदेशी यांचे बीजभाषण झाले.

'समाजातील सर्वच बुद्धिवंतानी स्त्री -पुरुष समानतेसाठी आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. केवळ कागदावर समानता असून उपयोगाची नाही, तर वास्तवातील समानता असायला पाहिजे. जोपर्यंत ही समानता येत नाही. तोपर्यंत आपण केवळ भारत महासत्ता होण्याची स्वप्नच पाहत राहू', असे प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सांगितले. 'आम्ही लावलेल्या या परिषदेच्या रोपट्याचे आज बहरलेला वटवृक्ष झाल्याचे पाहून समाधान वाटत आहे. ज्यांनी विद्यापीठ पातळीवर समाजशास्त्र विषय मोठा करण्यामध्ये हातभर लावला. त्यांना ही परिषद जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करत असून ही मोठी गोष्ट असल्याचे डॉ. पवार यांनी सांगितले.

स्त्रियांच्या प्रश्नांवर आज खंबीरपणे भूमिका कोणी घेत नाही. मारहाण, घरगुती हिंसाचार आदी माध्यमातून स्त्रियांना बंदिस्त करून ठेवले आहे. महात्मा फुले यांनी सत्यशोधक विचारातून पहिल्यांदा स्त्रियांना या जोखडातून मुक्त करण्याची भूमिका घेतली. सत्यशोधक बुद्धिजीवींनी केवळ लिहून अथवा बोलून चालणार नाही, तर त्यांनी एक भूमिका घेऊन आपल्यापरीने स्त्री मुक्तीचे कार्य केले पाहिजे. राज्य, समाज आणि धोरणकर्त्यांनी स्त्रियांना अधिकचे स्वातंत्र्य, हक्क द्यावेत, असे आवाहन डॉ. परदेशी यांनी केले.

या कार्यक्रमात समाजशास्त्र विषयात विद्यापीठात प्रथम आलेल्या तीन विद्यार्थ्यांचा, पीएच. डी. प्राप्त विद्यार्थ्यांचा आणि विद्यापीठ समाजशास्त्र अभ्यास मंडळावर निवड झालेल्या प्राध्यापकांचा सत्कार केला.

परिषदेचे समन्वयक डॉ. के. एम. देसाई यांनी स्वागत केले. अध्यक्ष प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी प्रास्ताविक केले. पी. के. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. संभाजी कांबळे यांनी आभार मानले.

### पुरस्कारप्राप्त प्राध्यापकांकडून परिषदेला देणगी

- प्रा. सकटे यांनी समाजशास्त्र परिषदेसाठी २५ हजार रुपयांची देणगी जाहीर केली. त्यावर जीवनगौरव पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ प्राध्यापकांनी प्रत्येकी दहा हजार रुपयांची देणगी दिली. दरम्यान, या अधिवेशनात 'स्वातंत्र्याची ७५ वर्षे आणि स्त्रिया' या विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी संशोधन पेपर सादर केले.

23 MAY 2023 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांच्या क्षमतांना वाव दिला पाहिजे

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील : शहाजी महाविद्यालयात समाजशास्त्र परिषदेत जीवनगौरव पुरस्कारांचे वितरण

**प्रतिनिधी**
**कोल्हापूर**

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात महिलांच्या क्षमतांना केवळ २० टक्केच वाव मिळाला आहे. महिलांच्या या क्षमतांना वाव मिळाला तर समाज अधिक सुदृढ व विकसित होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या शहाजी छत्रपती महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र परिषदेचे चौदावे अधिवेशन झाले. या अधिवेशनाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी रोपट्यास पाणी घालून परिषदेचे उद्घाटन झाले. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. समाजशास्त्र परिषदेच्या वतीने दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार प्रोफेसर डॉ. आर. बी. पाटील, डॉ. एन. डी. जत्राटकर, डॉ. रमेश जाधव, प्रोफेसर एस. डी. अकोळे यांना समाजशास्त्राचे ज्येष्ठ प्राध्यापक एस. एन. पवार यांच्या हस्ते प्रदान केला.




**शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनात सत्कारमूर्ती प्रोफेसर एस. डी. अकोळे, डॉ. रमेश जाधव, डॉ. एन. डी. जत्राटकर, डॉ. आर. बी. पाटील. सोबत प्रा. एस. एन. पवार, डॉ. मच्छिंद्र सकटे आदी.**

विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्षा डॉ. प्रतिमा परदेशी यांनी स्त्रियांच्या प्रगतीचा आढावा घेतला.

परिषदेचे समन्वयक डॉ. के. एम. देसाई यांनी स्वागत केले. परिषदेचे अध्यक्ष डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी प्रास्ताविक केले. समाजशास्त्र परिषदेसाठी २५ हजार रुपयेयांची देणगी देणार असल्याची घोषणा केली. जीवन गौरव पुरस्कार प्राप्त प्राध्यापकांनीही प्रत्येकी दहा हजार रुपयांची देणगी समाजशास्त्र परिषदेस दिली. समाजशास्त्र विषयात शिवाजी विद्यापीठात प्रथम आलेल्या तीन विद्यार्थ्यांचा तसेच पीएच. डी. प्राप्त विद्यार्थ्यांचा आणि शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र अभ्यास मंडळावर निवड झालेल्या प्राध्यापकांचा सत्कार केला. स्वातंत्र्याची ७५ वर्षे आणि स्त्रिया या विषयावर अनेक विद्यार्थ्यांनी संशोधन पेपर सादर केले. या विषयावर तसेच समाजशास्त्राचे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरावरील महत्त्व या विषयावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, मानद सचिव संगीता बोंद्रे यांचे या उपक्रमास प्रोत्साहन मिळाले.

पुण्यनगरी

# विद्यापीठात आज 'सिनेमाची रेसिपी'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने मंगळवार, दि. २३ रोजी सकाळी साडेअकरा वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये पुणे येथील सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या ऑडिओ व्हिज्युअल प्रोग्रॅम विभागाचे प्रमुख मिथुनचंद्र चौधरी यांचे 'सिनेमाची रेसिपी' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे.

यावेळी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित झालेली चौधरी यांच्या चौदा मिनिटांच्या 'पायवाट' या शॉर्ट फिल्मचे स्क्रीनिंग करण्यात येणार आहे. फिल्मफेअर पुरस्कार विजेते प्रसिद्ध दिग्दर्शक सचिन सूर्यवंशी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आहेत. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने चालू शैक्षणिक वर्षापासून 'सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंटरी फोटोग्राफी' आणि 'सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्ट फिल्म मेकिंग' हे दोन अभ्यासक्रम सुरू होत आहेत. या अभ्यासक्रमाचा शुभारंभ चौधरी यांच्या हस्ते होणार आहे.

चौधरी यांनी नागराज मंजुळे यांच्या 'फॅन्ड्री' चित्रपटात सहायक दिग्दर्शक, शिवाय मंजुळे यांच्या 'सैराट' या चित्रपटामध्ये त्यांनी मुख्य सहायक दिग्दर्शक म्हणून काम केले आहे.

लोकमत

# विद्यापीठात आज 'पायवाट' शॉर्ट फिल्मचे स्क्रीनिंग

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या



मिथुनचंद्र चौधरी

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे आज, मंगळवारी (दि. २३) सकाळी ११:३० वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये पुणे येथील सिम्बॉयसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीचे ऑडिओ-व्हिज्युअल प्रोग्रॅम विभागप्रमुख मिथुनचंद्र चौधरी यांचे व्याख्यान आयोजित केले आहे.

यावेळी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित झालेल्या चौधरी यांच्या चौदा मिनिटांच्या 'पायवाट' या शॉर्ट फिल्मचे स्क्रीनिंग करण्यात येणार आहे.

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे चालू शैक्षणिक वर्षापासून 'सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंटरी फोटोग्राफी' आणि 'सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्ट फिल्म मेकिंग' हे दोन अभ्यासक्रम सुरू होत आहेत.

या अभ्यासक्रमाचा शुभारंभ चौधरी यांच्या हस्ते होणार असल्याचे अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी सांगितले.

पुढारी

# विद्यापीठात आज डॉ. ग. गो. जाधव अध्यासनातर्फे 'पायवाट'चे स्क्रीनिंग

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने मंगळवार (दि. २३) रोजी सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये पुणे येथील सिम्बॉयसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या ऑडिओ-व्हिज्युअल प्रोग्रॅम विभागाचे प्रमुख मिथुनचंद्र चौधरी यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. याप्रसंगी त्यांच्या पायवाट शॉर्ट फिल्मचे स्क्रीनिंग होणार आहे. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे चालू शैक्षणिक वर्षापासून 'सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंटरी फोटोग्राफी' व 'सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्ट फिल्म मेकिंग' अभ्यासक्रम सुरू होत आहेत. अभ्यासक्रमाचा शुभारंभ चौधरी यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.